# प्रकरण - २

## नरसिंग गिरणी मिलविषयक माहिती

१) नरसिंग गिरणी मिलचा इतिहास

२) कामगार शिक्षण योजनेची आवश्यकता

३) कामगार शिक्षण योजनेची सुरुवात

४) कामगार संघटना

## प्रकरण दुसरे

## नरसिंग गिरजी मिलविषयक माहिती

संशोधकाने आपल्या शोधप्रबंधासाठी " सोलापूर शहरातील नरसिंग गिरजी मिलमधील कामगार शिक्षण योजनेचा समाजशास्त्रीय अभ्यास " असा विषय निवडला. आजपर्यंत कामकार विषयीचे अनेक विषयावर अनेक संशोधकांनी संशोधनपर अभ्यास केलेला आहे. प्रामुख्याने कामगारांच्या गैरहजेरीच्या वृत्तीचा अभ्यास, कामगारांची सामाजिक व आर्थिक परिस्थितीचा अभ्यास, कामगारांच्या व्यसनाधिनतेवर अभ्यास, कायद्याने व बिगर कायद्याने ( Statutory & Non-Statutory दुयावयाच्या कामगार कल्याण विषयक तरतूदींचा अभ्यास, कामगार व मालक यांच्यातील सामाजिक संबंधाचा अभ्यास इत्यादी अशा अनेक विषयांचा अभ्यास समाजशास्त्र, समाजकार्य (Social Work)अर्थशास्त्र, व्यवस्थापन इत्यादी विषयांच्या संशोधकांनी केलेला आहे.

केंद्रशासन, राज्यशासन, कामगार संघटना व मालक संघटना यांच्या साहयाने केंद्रिय कामगार शिक्षण मंडळाची स्थापना करून या मंडळामार्फत कामगार शिक्षण योजना राबवण्याचे कार्य हाती घेतले. ही कामगार शिक्षण योजना सुरु होऊन आज जवळ जवळ ३० वर्षे पूर्ण झालेली आहेत. गेल्या ३० वर्षात कामगार शिक्षण योजनेच्या कार्याचा व प्रगतीचा आढावा घेऊन योजनेचे मूल्यमापन करून ही योजना कामगारांसाठी आवश्यक आहे का ? कामगारांचा या योजनेकडे पाहण्याचा दृष्टीकोन कोणता आहे ? ही योजना योग्य दिशेने राबवली जाते की नाही ? ही योजना यशस्वी झाली की नाही ? हे पाहणे उचित ठरेल.

संशोधकाने अध्ययनासाठी निवडलेला विषय हा अतिशय व्यापक आहे. या विषयाची व्याप्ती अतिशय विस्तृत आहे. या विशाल स्वरूपाच्या विषयाचे अध्ययन करण्याचे संशोधकाने ठरवले. कामगार शिक्षण योजनेचे सदरचे संशोधनपर अध्ययन हे परिपूर्ण स्वरूपाचे नसून संशोधकाने केलेला परिमित प्रयत्न आहे. एखाद्या शहरातील एका मिलमधील कामगार शिक्षण योजनेचे संशोधनपर अध्ययन म्हणजे संपूर्ण कामगार शिक्षण योजनेचे परिपूर्ण अध्ययन आहे असे मानणे धाडसाचे व अतिशयोक्तीचे होईल. सदरचे संशोधनपर अध्ययन म्हणजे नरसिंग गिरजी मिलच्या स्वरूपात कामगार शिक्षण योजनेवर टाकलेला एक समाजशास्त्रीय पण मर्यादित दृष्टीक्षेप आहे.

१) <u>अभ्यासाचे कार्यक्षेत्र :-</u>

कामगार शिक्षण योजना ही देशातील सर्व क्षेत्रात राबवली जाते. संपूर्ण देशातील कामगार शिक्षण योजनेचे अध्ययन करणे प्रस्तुत संशोधकाला अशक्य आहे. म्हणून अध्ययन विषयासाठी विशिष्ट कार्यक्षेत्राची निवड करावी लागली. संशोधकाने सोलापूर शहरातील नरसिंग गिरणी मिलची निवड करून अध्ययन विषयासाठी कार्यक्षेत्राची कक्षा निश्चित केली. सदर मिल सोलापूर शहराच्या मध्यवर्ती ठिकाणी आहे.

२) <u>नरसिंग गिरजी मिलचा इतिहास :-</u>

<u>मिलचा पूर्वेतिहास :-</u>

इ.स. १८५८ साली सदर मीलची स्थापना झाली सदर मीलचे चालक राजा नरसिंग गिरजी हे होते. स्वातंत्र्यपूर्व काळात ही मिल व्यवस्थीत चालू

होती. १५ ऑगष्ट १९४७ ला भारत देश स्वतंत्र झाला. स्वतंत्र भारताने कामगारांना कायद्याने कांही प्रमाणांत संरक्षण दिले. १९४८ च्या कारखाना कायद्याने ( Factory Act 1948 ) कामगारांना अनेक सवलती मिळाल्या कायद्याच्या तरतूदीप्रमाणे कामगारांना वेतन, भविष्य निर्वाह निधी, सेवा निवृत्ती इत्यादींचा मिलवर आर्थिक बोजा पडला. वर्षानुवर्षे मिल सतत तोटयात चालू लागली. कोणत्याही भांडवलदाराचे जास्तीत जास्त नफा मिळवणे हा हेतू असतो. त्यामुळे कोटयावधी रूपयांची गुंतवणूक करून जर नफा मिळत नसेल तर कोणताही भांडवलदार आपला उद्योग चालवणार नाही. याला नरसिंग गिरजी मिलचे चालकही अपवाद नव्हते. मिलच्या चालकांनी सदर मिल ८-८-१९५७ पासून बंद ठेवली.

## कामगारांचा प्रश्न :-

नरसिंग गिरजी मिल बंद झाल्यामुळे अनेक कामगार बेकार झाले. सर्व कामगारांची कुटुंबेच उध्वस्त झाली. त्यांच्या सामाजिक व कौटुंबिक जीवनावर परिणाम झाला. कामगारांच्या प्रश्नांचा व त्यांच्या परिस्थितीचा विचार करून महाराष्ट्र शासनाने उच्च न्यायालयाकडून ( High Court ) लीक्वीडेशनवर ( Liquidation ) १९६२ साली ही मिल चालविण्यास घेतली. अशा रीतीने १९६४ साली नरसिंग गिरजी मिल महाराष्ट्र शासनाच्या मालकीची झाली. आजतागायत सदर मिल व्यवस्थित चालू आहे. आज मिलमध्ये २२८ स्त्री कामगारासह ४००० पेक्षा अधिक कामगार काम करत आहेत.

## कामगारांविषयी माहिती :-

नरसिंग गिरजी मिलमध्ये ६० टक्के पेक्षा अधिक कामगार अल्पशिक्षित

व अशिक्षित आहेत. यावरून आपणास असे दिसते की श्रमदान करणारे श्रमीक हे अल्प प्रमाणात शिक्षण घेतलेले असतात. जास्त शिक्षण घेतलेल्या व्यक्तींचा कल पांढरपेशीय व्यवसायाकडे (उदा. कारकून, अधिकारी, अभियंता इ.) असतो असे म्हणणे अतिशयोक्तीचे ठरणार नाही.

कोणत्याही उद्योगाचा विकास होण्यासाठी तेथील कामगारांना आपल्या कामाविषयीची सर्वांगीण माहिती असणे आवश्यक आहे. तसेच औद्योगिक क्रांतीनंतर औद्योगिककरणाची झपाट्याने वाढ होत आहे. आधुनिक अशा नविन स्वयंचलित यंत्राचा वापर मोठ्या प्रमाणात होत आहे. त्यामुळे सर्व सामान्य कामगारांना स्वयंचलित यंत्रे हाताळण्याचे ज्ञान व कौशल्य प्राप्त करून घेणे महत्वाचे आहे. "मानव हा यंत्राचा गुलाम नाही तर तो एक यंत्रावर काम करणारा सेवक आहे याची जाणीव कामगारांना झाली पाहिजे."

३) कामगार शिक्षण योजनेविषयीची आवश्यकता :-

कामगारांना आपल्या देशाविषयीची माहिती, कामगार संघटनेचे महत्व व तीविषयी माहिती, कामगारांच्या आरोग्याविषयी माहिती, कामगार कायदा विषयीची माहिती इत्यादींची सर्वांगीण माहिती करून देणे हे मिलच्या व्यवस्थापनाच्या कामगारांच्या व कामगार संघटनांच्या दृष्टीने हिताचे तसेच महत्वाचे आहे. यामुळेच आज कामगार शिक्षण योजनेला महत्व प्राप्त झाले आहे.

कामगार शिक्षण योजनेचे महत्व लक्षात घेऊन मिलच्या व्यवस्थापनाने कामगार शिक्षण योजना राबवण्याचे ठरवले. त्यानुसार मिलच्या व्यवस्थापनाने सुरुवातीला कांही कामगार प्रशिक्षणासाठी पाठवले, ते तीन महिन्याचा कामगार शिक्षकांचा कोर्स पूर्ण करून आले. जे कामगार शिक्षकांचा कोर्स पूर्ण करून आले त्यांचे

शिक्षणाही समाधानकारक नाही. त्यांचे शिक्षण मॅट्रीक पर्यंतचे आहे.

४) कामगार शिक्षण योजनेची सुरुवात :-

प्रशिक्षित कामगार शिक्षकांनी नरसिंग गिरजी मिलमध्ये २४ जानेवारी १९६६ पासून कामगार शिक्षण वर्गाची सुरुवात केली. कामगार शिक्षण वर्गाकरता केंद्रीय कामगार शिक्षण मंडळाकडून अनुदान मिळत असले तरी हे अनुदान मर्यादितच असते. त्यामुळे व्यवस्थापनास या योजनेवर बराच खर्च करावा लागत असला तरी पण कामगार शिक्षण योजनेचे महत्व लक्षात घेऊन ही योजना यशस्वीपणे चालवली आहे. हे गेल्या २२ वर्षात झालेल्या ७० वर्गावरुन दिसून येते. या योजनेस कामगारही मोठ्या प्रमाणावर प्रतिसाद देतात प्रत्येक वर्गात ४० कामगारांना प्रवेश दिला जातो. कांहीतर प्रवेश घेतल्यानंतर वर्गात हजर राहीले नाहीत. गेल्या २२ वर्षातील ७० वर्गामधून २५०० कामगारांनी कामगार शिक्षण वर्गाचा लाभ घेतला. आज अस्तित्वात असलेल्या ४००० कामगारांपैकी किती कामगार योजनेत प्रशिक्षित झालेले आहेत, याची आकडेवारी उपलब्ध नाही. अशा प्रकारची नोंद ठेवण्याची मिलला गरज भासली नसावी.

५) कामगार संघटना :-

नरसिंग गिरजी मिलमध्ये कामगारांच्या दोन कामगार संघटना आहेत. एक इंटक प्रणित राष्ट्रीय गिरणी कामगार संघ व दुसरी कम्युनिष्ट प्रणित गिरणी कामगार युनियन. अधून मधून नविन संघटनांचा उदय व अस्त होत राहतो. नरसिंग गिरजी मिलमधील दोन कामगार संघटनापैकी राष्ट्रीय गिरणी कामगार संघ अधिकृत म्हणजे मान्यता प्राप्त आहे व गिरणी कामगार युनियन ही अनधिकृत म्हणजे मान्यता प्राप्त नसलेली आहे.